**व्यवसाय / धंधा**

**अभिषेक मार्केटिंग येथे होलसेल** भावात बेकरीचे माल मिळेल. १० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड, बनपाव, क्रिमबन, क्रीमरोल ७.५० रु. २० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ६ नग कपकेक, बिस्किट, ब्रेड, क्रिमबन १५ रु. मिळेल. ३० रु विक्रीचे टोस्ट, बटर, खारी, ब्रेड २२.५० पैसे. ४० रु. विक्रीचे टोस्ट, बटर, खारी ३० रु मिळेल. तुळजापूर वेस, गोल तालीम जवळ, सोलापूर.

**मो: ९४२२६५११०१**



दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

# कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com








सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष १९ वे, अंक २७८ | बुधवार, दि. १८ जून २०२५ | पाने ४ | पोष्ट परवाना: - SLP/02/2020-2022 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR


# शेतकऱ्यांची आर्थिक नाकेबंदी; विमा कंपनीकडून भरपाई मिळेना अन साखर सम्राट उसाची बिले देईना

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** साखर आयुक्तांनी नोटीस बजावल्यानंतर साखर कारखानदार घाबरले नाहीत, आरआरसी कारवाई केल्यानंतर पैसे देण्याचे नावही कारखाने घेत नाहीत, आरआरसी आदेशाला अडीच महिने झाले. मात्र महसूल खाते कारवाईचे धाडस करीत नाही.

खरीप पेरणीची लगबग सुरू असताना कारखाने व विमा कंपनी पैसे देत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक नाकेबंदी झाली आहे.

वर्ष- दीड वर्ष जोपासलेला ऊस साखर कारखानदार घेऊन गेले. तोडणी करणाऱ्यापासून वाहतूक करणाऱ्यांनीही शेतकऱ्यांकडून पैसे घेतले तेव्हा ऊस घेऊन गेले. उसाचे पैसे मात्र शेतकऱ्यांना मिळाले नाहीत. सोलापूर जिल्ह्यातील १३ साखर कारखान्यांकडे सरलेल्या हंगामातील जवळपास १३४ कोटी रुपये शेतकऱ्यांचे अडकले आहेत.

शेतकरी साखर कार्यालय व साखर कारखान्यांवर हेलपाटे घालत आहे. ऊसतोडणी करून पाच व सहा महिन्यांचा कालावधी होत आला तरी ऊस उत्पादक पैशासाठी त्रासतो आहे. साखर सहसंचालक व साखर संचालकांनी पैसे देण्यासाठी नोटीस दिल्या; मात्र कारखानदारांनी वायदे सांगत वेळ मारून नेली.

साखर आयुक्तांनी सुनावणी घेऊन आरआरसी कारवाई केली; मात्र कारवाईचे अधिकार असलेल्या महसूल यंत्रणेने शेतकऱ्यांना लटकावणाऱ्या साखर कारखानदारांचे काहीही केले नाही. विमा कंपनीने सोलापूर जिल्हातील पाच लाख शेतकऱ्यांना विम्याची रक्कम मंजूर केली नाही तर मंजूर ७३ हजार शेतकऱ्यांची रक्कम



दिली नाही.

सोलापूर जिल्ह्यातील १२ साखर कारखान्यांवर आरआरसीची कारवाई केल्यानंतर लोकमंगल बीबीदारफळ व लोकमंगल भंडारकवठे या कारखान्यांनी शेतकऱ्यांचे ऊस बिल दिले आहे. मातोश्री लक्ष्मी शुगर, गोकुळ, जयहिंद, सिद्धेश्वर, सिद्धनाथ, इंद्रेश्वर, सहकार शिरोमणी वसंतराव काळे, धाराशिव शुगर, सांगोला या कारखान्यांवर आरआरसीचे आदेश निघाले; मात्र शेतकऱ्यांचे पैसे काही दिले नाहीत.

शेतकऱ्यांच्या उसाचे पैसे न देणाऱ्या साखर कारखान्यांना वारंवार नोटीस देण्यात आल्या. सुनावणी घेण्यात आली. शेतकऱ्यांचे पैसे देण्यात यावेत यासाठी साखर आयुक्तांनीही सुनावणी घेतली. ऊस उत्पादकांचे पैसे थकविणाऱ्या कारखान्यांवर नियमानुसार आरआरसी कारवाई केली आहे. पुढील कारवाई महसूल खात्याने करावयाची आहे.

**- प्रकाश आष्टेकर,** सहसंचालक, सोलापूर.

---

साखर कारखान्यांनी ऊस उत्पादकांचे पैसे न दिल्याने शेतकऱ्यांची अडचण होते. आरआरसी कारवाईतून काहीच साध्य होत नाही. साखर रेशनवर दिली तर सर्वसामान्य कुटुंबाला ठराविक वेगळा दर व इंडस्ट्रीजसाठी वेगळा दर दिला तर साखरेतून कारखान्यांना आगाऊ चार पैसे मिळू शकतात.

**- सुहास पाटील, सदस्य,** ऊस दर नियंत्रण समिती.

# काँग्रेसला जिल्हाध्यक्ष मिळेना उमेदवार कसे मिळणार ?


## भाजप- शरद पवार राष्ट्रवादीमध्येच सामना !


**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून गेल्या तीन वर्षांपासून रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची रणधुमाळी आता सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर सुरू होणार असल्याने सत्तेपासून दुरावलेल्या कार्यकर्त्यांचा उत्साह संचारला आहे. जिल्ह्यात सध्या भाजपचे पाच, शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे चार आमदार आहेत. शिवसेना ठाकरे गटाचा एक आणि शेकापचा एक आमदार आहे. जिल्ह्यात भाजप आणि शरद पवार यांच्या राष्ट्रवादीची ताकद जवळपास समान असल्याने जिल्हा परिषदेच्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षाविरुध्द शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसमध्येच सामना होणार असल्याचे सध्याचे तरी चित्र आहे.

सोलापूर जिल्हा परिषदेत मार्च २०२२ पासून प्रशासकराज सुरू आहे. आता न्यायालयाच्या निकालानंतर निवडणुकीचा मार्ग मोकळा झाला आहे. शासनाने महापालिका, नगरपालिकांपाठोपाठ जिल्हा परिषदेचाही प्रभाग रचनेचा कार्यक्रम जाहीर केल्याने ऑक्टोबर किंवा नोव्हेंबरमध्ये निवडणुकीची

रणधुमाळी सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. दरम्यान, लोकसभा, विधानसभा निवडणुकीत पक्षाचे प्रामाणिकपणे काम केलेल्या कार्यकर्त्यांच्या आशा आता पल्लवित झाल्या आहेत.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादीची मोहोळ, माढा व करमाळा या तालुक्यात बऱ्यापैकी वर्चस्व आहे. राष्ट्रवादी अजितदादा गटाचे तत्कालीन जिल्हाध्यक्ष दीपक साळुंखे-पाटील यांनी विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा देऊन शिवसेना ठाकरे





गटात प्रवेश केला होता.

तेव्हापासून अजितदादांच्या राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्षपद रिक्तच आहे. दरम्यानच्या काळात सोलापूरच्या संपर्कमंत्रिपदाची जबाबदारी उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी स्वतःकडे घेतली. परंतु निवडीनंतर पक्ष संघटनेच्या कामासाठी त्यांचा जिल्ह्यात एकही दौरा झाल्याचे ऐकिवात नाही. आता जिल्हा परिषदेच्या

निवडणुकीपूर्वी त्यांच्या पक्षाला नवीन जिल्हाध्यक्ष मिळण्याची शक्यता आहे.

शिवसेना ठाकरे गट व शिंदे गटाची ताकद नगण्य असल्याने त्यांच्या वाट्याला फारशा जागा येतील असे वाटत नाही. दरम्यान, अक्कलकोट येथील माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे आणि करमाळ्याचे माजी आमदार जयवंतराव जगताप यांनी शिंदे गटात प्रवेश केला आहे. त्यांच्यापाठोपाठ आता उत्तर सोलापूर

तालुक्याचे नेते, जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष व राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष बळीरामकाका साठे हेही शिंदे गटाच्या वाटेवर असल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे जिल्ह्यात काही प्रमाणात शिंदे गटाची ताकद वाढताना दिसत आहे.

दुसरीकडे डॉ. धवलसिंह मोहिते-पाटील यांनी काँग्रेस जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यानंतर हे पद रिक्तच आहे. कार्याध्यक्ष असलेले मंगळवेढ्याचे ॲड. नंदकुमार पवार यांच्यावर प्रभारी अध्यक्ष म्हणून जबाबदारी देण्यात आली आहे. काँग्रेसचे निरीक्षक मोहन जोशी यांनी जिल्हाध्यक्षपदासाठी व्यक्तीचा शोध सुरू केला आहे. यासाठी काही नावे पुढे आली. परंतु जोशी यांना हवा तसा अध्यक्ष मिळत नसल्याने त्यांची गोची झाली आहे. पंढरपूरचे भगीरथ भालके यांच्या नावाची चर्चा होती. परंतु त्यांनी नकार दिल्याचे सांगण्यात येते. आता तर त्यांनी शिंदे गटाची वाट धरल्याचे बोलले जात आहे. जिल्हाध्यक्ष न मिळणे ही काँग्रेससाठी नामुष्की आहे.

माळशिरस, माढा, मोहोळ आणि करमाळ्यात शरद पवार यांच्या राष्ट्रवादीचे आमदार आहेत. त्यामुळे साहजिकच तेथे त्यांची ताकद असणार आहे. त्यानंतर दक्षिण सोलापूर, अक्कलकोट आणि पंढरपूर येथे भाजपचे आमदार आहेत. भाजपचे दोन आमदार शहरी भागातील असल्याने त्यांचा जिल्हा परिषदेवर फारसा प्रभाव दिसणार नाही. बार्शीत शिवसेना ठाकरे गटाचा तर सांगोल्यात शेकापचा आमदार आहे. त्यामुळे तेथे बऱ्यापैकी त्यांची ताकद असणार आहे. अक्कलकोटला भाजपचा आमदार असला तरी माजी मंत्री सिध्दाराम म्हेत्रे हे शिवसेना शिंदे गटात गेल्याने तेथेही आता समसमान जागा येतील, असे चित्र आहे. काही झाले तरी जिल्हा परिषदेची लढत ही भाजपविरूध्द शरद पवार यांच्या राष्ट्रवादीतच होईल, हे निश्चित आहे.

# भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेऊ शकत नाही- शरद पवार

**मुंबई (कटूसत्य वृत्त):-** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी मंगळवारी पिंपरी-चिंचवडमधील एका कार्यक्रमात भाजपला फैलावर घेतलं. तसेच भाजपशी हातमिळवणी करणाऱ्यांचाही शरद पवार यांनी समाचार घेतला.

भाजपसोबत गेलेल्या संधीसाधूंना सोबत घेऊ शकत नाही, असे शरद पवार म्हणाले.

गांधी, नेहरू, चव्हाण, फुले, शाहू आणि आंबेडकर यांच्या विचारांचे असेल त्यांना सोबत घेऊ. पण सत्तेसाठी भाजप बरोबर जाऊन बसायचं ही भूमिका कोणी मांडत असेल तर हा विचार काँग्रेसचा नाही. त्यामुळे कोणाशीही संबंध ठेवा पण भाजपशी संबंध हा काँग्रेसचा



विचार असू शकत नाही. अशा पद्धतीने संधीसाधूपणाचं राजकारण हे आपल्याला प्रोत्साहित करायचं नाही. त्या दृष्टीकोणातून पावलं ही आपल्याला टाकायची आहेत, असे शरद पवार यांनी स्पष्ट केले.

जे गेले त्यांची चिंता करू नका. मी असे अनेक प्रसंग पाहिले आहेत. माज्यासोबतच्या अनेक सहकाऱ्यांनी साथ सोडली. पण ज्या-ज्यावेळी असं घडलं तेव्हा मी चिंताग्रस्त झालो नाही. मला कार्यकर्त्यांनी खंबीर साथ दिली आणि जनतेने पाठिंबा दिला. त्यानंतरही मी सत्तेत आलेलो आहे. त्यामुळे कोण आला, कोण गेला याची चिंता करू नका. लोक शहाणे आहेत, आज ही लोकशाही जनतेच्या शहाणपणाने टिकलेली आहे. ती यापुढेही टिकून राहणार आहे, असे शरद पवार म्हणाले.

निवडणुकीची काळजी करू नका. आपल्यासोबत जो येणार असेल, ते आपल्या विचारांशी जोडून राहणार असतील तर त्यांचा विचार वरिष्ठ करतील. मी तुम्हाला विश्वास देतो. आगामी महापालिका निवडणुकीबाबत तुम्ही चिंताच करू नका, असे सांगत शरद पवार यांनी कार्यकर्त्यांमध्ये उत्साह भरला.

# पंढरपूर वारीसाठी रेल्वेकडून ८० ट्रेन, वारकऱ्यांसाठी विशेष सेवा चालवणार

**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** वटपौर्णिमा म्हणजेच ज्येष्ठ पौर्णिमा झाली की, सर्वांनाच आषाढी एकादशीचे वेध लागतात. संतांच्या पालख्या पंढरपूरच्या दिशेने जातात. लाखो वारकरी पंढरपूरला जाऊन विठ्ठलाचे दर्शन घेतात. आषाढ महिन्यातील शुद्ध एकादशीस महाएकादशी किंवा शयनी एकादशी म्हणतात. प्रत्येक महिन्याच्या शुक्ल व कृष्ण पक्षांतील अकरावी तिथी एकादशी या नावाने संबोधिली जाते. विष्णूची अत्यंत प्रिय तिथी, अशी तिची प्रसिद्धी आहे. प्रत्येक महिन्यात दोन याप्रमाणे वर्षातून २४ एकादशी येतात. उपवास व जागरण करून संपूर्ण दिवस हरिकीर्तनात घालविणे हा या दिवसाचा विशेष आहे. वारकऱ्यांच्या सोयीसाठी रेल्वेकडून ८० विशेष ट्रेन चालवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आषाढी वारीसाठी मध्य रेल्वेकडून



पंढरपूरसाठी ८० पेक्षा अधिक विशेष ट्रेन चालवल्या जात आहेत. सोलापूर जिल्ह्यासह राज्यातील भाविकांच्या सोयीसाठी मध्य रेल्वेची ही सेवा असणार आहे. पुणे, नागपूर, अमरावती, कलबुर्गी, भुसावळ अशा अनेक महत्त्वाच्या रेल्वे स्थानकावरून या ट्रेनची सेवा सुरू करण्यात येणार आहे. यामुळे वारीसाठी, आषाढी एकादशीसाठी पंढरपूरला येणाऱ्या भाविकांची सोय होणार असल्याचे सांगितले जात आहे.

**कोणत्या मार्गांवर चालवल्या जाणार विशेष सेवा ?**

पुणे-मिरज, नागपूर-मिरज, न्यू अमरावती-पंढरपूर विशेष, खामगाव-पंढरपूर विशेष, लातूर-पंढरपूर, भुसावळ-पंढरपूर अनारक्षित विशेष, मिरज-कलबुर्गी, कोल्हापूर-कुर्डूवाडी अशा ८० पेक्षा अधिक आषाढी विशेष फेऱ्यांसाठी मध्य रेल्वे प्रशासन सज्ज असल्याचे रेल्वे प्रशासनाने असल्याचे म्हटले जात आहे. या ट्रेनचे आरक्षण सुरू झाले आहे. तसेच राज्य सरकारने पंढरीच्या वारीसाठी येणाऱ्या वाहनांना टोलमाफीचा निर्णय घेतला असून त्याचा शासन आदेशही निघाला आहे. दरम्यान, १८ जून २०२५ रोजी जगद्गुरू संत शिरोमणी तुकाराम महाराजांच्या पालखीचे देहू येथून प्रस्थान होणार आहे. तर संत ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीचे आळंदी येथून १९ जून २०२५ रोजी प्रस्थान होणार आहे. या दोन्ही पालख्यांची प्रस्थान, आगमन आणि पंढरीतून परतीच्या प्रवासाचे वेळापत्रक जारी करण्यात आले आहे. तसेच अन्य मानाच्या पालख्यांचे प्रस्थानही होत आहे.

# सोलापूर-दिल्ली विमानसेवा नोव्हेंबरपासून सुरू होणार



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** सोलापुरातून गोव्यासाठी प्रवासी विमानसेवा सुरू झाल्यानंतर येत्या नोव्हेंबरअखेर होटगी रोडवरील विमानतळावरून दिल्लीसाठी विमानसेवा सुरू करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. दरम्यान, स्टार एअर लायन्स कंपनी मुंबई, पुणेसाठी ऑगस्टमध्ये विमान सुरू करण्याची तयारी सुरू केली आहे, तर त्याआधी तिरुपतीला विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे, अशी माहिती प्रशासनातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.

सोलापूर ते गोवा या प्रवासी विमानसेवेची सुरुवात नऊ जूनपासून झाली आहे. या विमानसेवेस सोलापूरकरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. दररोज सरासरी 70 ते 80 प्रवासी प्रवास करत आहेत. त्यामुळे कोकण परिसर, गोव्यातून जिल्ह्यातील धार्मिक पर्यटनस्थळी येणाऱ्यांची संख्या वाढत आहे. अशा भाविकांची गोवा-सोलूपर विमानसेवेमुळे सोय झाली आहे. येत्या 15 ऑगस्टपर्यंत सोलापूरातून मुंबई व पुणे या दोन शहरांसाठी प्रवासी विमानसेवा सुरु होण्याची शक्यता आहे. तत्पूर्वी सोलापूर ते तिरुपती ही सेवाही सुरु होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली.

सोलापुरातून मुंबई व पुणे या दोन्ही ठिकाणची प्रवासी विमानसेवा सुरु झाल्यानंतर सोलापुरातून दिल्ली, बंगळुरु, भाग्यनगर या सारख्या शहरासाठीही प्रवासी विमान सेवा सुरु होण्याची शक्यता आहे.

**मुख्यमंत्र्यांच्या उपस्थितीत होणार कार्यक्रम**

सोलापूर ते गोवा प्रवासी विमानसेवा उद्घाटनास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस उपस्थित राहणार होते; मात्र प्रतिकूल हवामानामुळे विमान उतरू न शकल्याने मुख्यमंत्री या दिवशी सोलापुरात आले नाहीत. मुंबई व पुणे येथील प्रवासी विमानसेवेच्या उद्घाटनासाठी मात्र मुख्यमंत्री सोलापुरात येतील, असा विश्वास केंद्रीय विमान सेवा राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी व्यक्त केला होता. त्यामुळे मुख्यमंत्री यांच्या हस्तेच 15 ऑगस्ट दरम्यान सोलापूर-मुंबई ही प्रवासी विमानसेवा सुरू होण्याची शक्यता आहे.

# गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून द्या- सिईओ जंगम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त):-** पिण्याच्या पाण्याच्या स्त्रोतांची रासायनिक व जैविक पाणी गुणवत्ता तपासणी करण्यासाठी जिल्ह्यात क्षेत्रीय तपासणी संच (एफ.टी.के.) द्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीम राबविण्यात येत आहे.जिल्ह्यातील सर्व ११२५ गावामध्ये ही मोहीम राबवून नागरिकांना स्वच्छ, शुध्द गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी उपलब्ध करून देण्याचे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी केले आहे.

आज सिईओ यांचे निजी कक्षात पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेचा लोगोचे अनावरण सिईओ कुलदीप जंगम यांच्या हस्ते करणेत आले. या प्रसंगी उप मुख्य कार्यकारी अधिकारी अमोल जाधव, कार्यकारी अभियंता संजय धनशेट्टी, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, अतिरिक्त जिल्हा आरोग्यधिकारी नंदकिशोर घाडगे , जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक सचिन जाधव, प्रशिक्षण समन्वयक शंकर बंडगर, जिल्हा पाणी गुणवत्ता सल्लागार दिपाली व्हटे, सनियंत्रण सल्लागार यशवंती धत्तुरे, वित्त व संपादणूक सल्लागार अर्चना कणकी, सनियंत्रण सल्लागार प्रतिक्षा गोडसे, संवाद सल्लागार सचिन सोनवणे, क्षमता बांधणी सल्लागार महादेव शिंदे, सांडपाणी सल्लागार प्रशांत दबडे उपस्थित होते.

याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम म्हणाले, पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेतंर्गत रासायनिक व जैविक क्षेत्रीय तपासणी (एफ.टी.के.) संचाद्वारे गावांमध्ये जनजागृती अभियान राबविण्याबाबत (पान 2 वर..)

# शाहरुखचा एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना शाबासकी; 1 लाख रुपयांचे बक्षीस

**पुणे (कटूसत्य वृत्त):-** पुण्यातील सराईत गुंड शाहरुख शेख उर्फ अट्टी याचा सोलापुरात भल्या पहाटे एन्काऊंटर करण्यात आला होता. पुणे पोलिसांच्या दप्तरी अनेक गुन्हे दाखल असलेल्या सराईत गुन्हेगाराचा सोलापुरातील लांबोटीजवळ पुणे गुन्हे शाखेनं एन्काऊंटर केला.

शाहरुख उर्फ अट्टी रहीम शेख (वय 23) याला गंभीर अवस्थेत सोलापूर येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र, उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाल्याची माहिती समोर आली. या घटनेनं पुणे आणि सोलापुरात खळबळ उडाली होती. आता,



शाहरुखचा एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना शाबासकी देण्यात आली आहे. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांच्याकडून ज्या पोलिसांनी शाहरुख शेखचा एन्काऊंटर केला, त्यांना 1 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. शाहरुख हा सराईत गुन्हेगार होता. 2011 पासून आजतागायत त्याच्यावर एकूण 15 गंभीर गुन्हे दाखल होते. त्यामुळे, त्याच्यावर मोक्काअंतर्गत गुन्हा देखील करण्यात आली होती.

शाहरुखचा एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना 1 लाख रुपयांचे बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुन्हे शाखेला हे बक्षीस देऊ केले आहे. गुन्हे शाखेच्या युनिट 6 च्या पथकाला आयुक्तांकडून बक्षीस जाहीर करण्यात आलं आहे. शाहरुख शेख हा सराईत गुंड असून त्याच्यावर खून, दरोडा, गोळीबार यासारखे अनेक गुन्हे दाखल होते. पोलिसांना गुंगारा देऊन तो सोलापूरमध्ये लपून बसला होता. सोलापूरमध्ये शाहरुख त्याच्या नातेवाईकांकडे लपून बसल्याची माहिती पुणे पोलिसांच्या गुन्हे शाखेला मिळाली होती. गुन्हे शाखेच्या युनिट 6 चे पथक सोलापूरमधील लांबोटी या गावात गेले आणि थेट शाहरुखच्या घरावर पोहचले. त्यावेळी, शाहरुख आणि पोलिसांमध्ये चकमक झाली, (पान 2 वर..)




संपादकीय

# दुर्घटनांची जबाबदारी

गेल्या काही दिवसांच्या कालावधीमध्ये भारतात जमिनीवर, पाण्यामध्ये आणि हवेत ज्या विविध प्रकारच्या दुर्घटना घडल्या आहेत त्यांना जबाबदार कोण, याची चर्चा पुन्हा एकदा सुरू झाली आहे. पुणे जिल्ह्यात कुंडमळा येथे इंद्रायणी नदीवरील एक जुना पूल कोसळल्यानंतर जी प्राणहानी झाली त्यानंतर अशा अपघातांची जबाबदारी कोणावर निश्चित करायची याबाबत हिरीरीने चर्चा सुरू झाली आहे. अर्थात, अशा प्रकारच्या कोणत्याही दुर्घटनेनंतर सरकार आपली सामाजिक जबाबदारी म्हणून अशा दुर्घटनांमध्ये प्राण गमावलेल्या लोकांच्या नातेवाईकांना काही नुकसानभरपाई जाहीर करते आणि जखमींवर सरकारतर्फेच मोफत उपचारही केले जातात. म्हणून या सर्व घटनांची संपूर्ण जबाबदारी सरकारने घ्यायची का, या प्रश्नाचे उत्तर द्यायची वेळ आता आली आहे.

पहलगामसारख्या घातपाती प्रकरणामध्ये सरकारने जबाबदारी स्वीकारून मृताच्या नातेवाईकांना आर्थिक मदत देणे समजण्यासारखे असले तरी ज्या ठिकाणी गर्दीच्या अतिरेकामुळे काही घटना घडल्या आहेत त्या ठिकाणीसुद्धा सरकारला आपली तिजोरी खाली करावी लागत आहे. गेल्या आठवड्यात अहमदाबाद येथे झालेला विमान दुर्घटनेसारख्या घटनांचा अपवाद वगळता गर्दीच्या बेशिस्तीमुळे आणि अतिरेकी वर्तणुकीमुळे जर एखादी दुर्घटना घडली असेल, तर ती जबाबदारी सरकारने आर्थिकदृष्ट्या स्वीकारावी का, याचासुद्धा आता विचार करायला लागणार आहे. अर्थात, शेवटी गर्दीचे मानसशास्त्र कोणाच्या हातात नसले, तरी त्या गर्दीचे व्यवस्थापन करणे मात्र सरकारी यंत्रणांच्या हातात असते हेसुद्धा या ठिकाणी विसरून चालणार नाही.

कुंभमेळ्याच्या कालावधीमध्ये उत्तर प्रदेशात प्रयागराज येथे झालेली मोठी चेंगराचेंगरी असो किंवा त्यानंतर आयपीएलचा अंतिम सामना संपल्यानंतर बेंगळुरूला विजयी जल्लोष साजरा करत असताना स्टेडियमबाहेर झालेली चेंगराचेंगरी असो किंवा पुणे जिल्ह्यातील कुंडमळा येथे नागरिकांनी जुन्या पुलावर क्षमतेच्या बाहेर केलेल्या गर्दीमुळे झालेली दुर्घटना असो, या सर्वच प्रकारांमध्ये प्रामुख्याने गर्दीच जबाबदार आहे असे दिसते. काही दिवसांपूर्वी दिल्ली रेल्वे स्थानकावरही कुंभमेळ्याला जाणाऱ्या प्रवाशांच्या गर्दीमुळे चेंगराचेंगरी झाली होती. मुंबईमध्ये समोरासमोरून जाणाऱ्या दोन रेल्वेतील प्रवासी एकमेकांना धडकल्याने काही जणांचा खाली पडून मृत्यू झाला होता. मुंबईतील अनेक रेल्वेस्थानकांनी यापूर्वी गर्दीमुळे झालेल्या चेंगराचेंगरीचा अनुभव घेतला आहे. देशातील प्रमुख धार्मिक स्थळांच्या ठिकाणीसुद्धा भाविकांनी केलेल्या अफाट गर्दीमुळे चेंगराचेंगरीच्या घटना घडून प्राणहानी होते. या सर्व घटना आठवण्याचे कारण म्हणजे अशा प्रकारची घटना घडली की नेहमीच सरकार काय करत होते, असा प्रश्न विचारला जातो. जर एखाद्या ठिकाणी सरकारी यंत्रणांनी हे ठिकाण धोकादायक आहे असा प्रकारचा फलक लिहिल्यानंतरसुद्धा पर्यटकांनी गर्दी केली तर त्याला कोणाला जबाबदार धरायचे याचा विचारही आता करावा लागणार आहे. पुणे जिल्ह्यातील कुंडमळा येथील घटना हे केवळ एक प्रतिनिधिक उदाहरण आहे.

महाराष्ट्रात आणि देशात अशी अनेक ठिकाणे आहेत जी पर्यटकांसाठी धोकादायक आहेत. पण जीवावर उदार होऊन पर्यटक तिथे जातात आणि अनेकवेळा अशा प्रकारच्या दुर्घटना घडतात. कल्याणकारी लोकशाही स्वीकारलेल्या भारताने केंद्रीय पातळीवर किंवा राज्य पातळीवर अशा प्रकारच्या दुर्घटनांनंतर मृतांच्या नातेवाईकांना आणि जखमींना आर्थिक मदत करणे जरी समजण्यासारखे असले, तरी अशा प्रकारच्या दुर्घटना होऊ नयेत म्हणून गर्दीला शिस्त लावण्यासाठीसुद्धा काही प्रबोधनात्मक कार्यक्रम राबवण्याची गरज आता अधोरेखित होत आहे. कारण चक्क राज्य सरकारद्वारे आयोजित 'महाराष्ट्र भूषण' पुरस्कारावेळी झालेली चेंगराचेंगरी आणि त्यात बळी पडलेल्या मृतांचा आकडा बघता सरकारने या घटनेपासून काहीतरी बोध घ्यायला हवा होता. पण त्यादिशेने कोणतेही प्रयत्न झालेले नाही.

एखादी अपवादात्मक घटना वगळली तर अनेक वेळा गर्दी अनियंत्रित झाल्यामुळे आणि या गर्दीला कोणत्याही प्रकारची शिस्त नसल्यामुळेच दुर्घटना घडतात असेच अहवाल आतापर्यंत चौकशीनंतर समोर आले आहेत. अहमदाबादसारख्या एखाद्या मोठ्या विमान अपघाताचे कारण तांत्रिक असू शकते. अनेक वेळा तो घातपातही असू शकतो. पण मोठ्या प्रमाणावर गर्दी झाल्यामुळे ज्या दुर्घटना घडतात त्यामागे मात्र हे गर्दीचे मानसशास्त्र आणि गर्दीचे न होणारे व्यवस्थापन हेच कारण आहे. साहजिकच अशा प्रकारच्या दुर्घटना घडल्यानंतर सर्वसामान्य नागरिकांकडून नेहमीच्या पद्धतीने सरकारी यंत्रणांना जबाबदार धरले जात असले, तरी या दुर्घटनांना खऱ्या अर्थाने कारणीभूत ठरणाऱ्या गर्दीचाही त्यात मोठा सहभाग असतो हेसुद्धा नाकारून चालत नाही. म्हणूनच आता शालेय पातळीपासून अनावश्यक गर्दी न करण्याचे आणि गर्दी झालेल्या ठिकाणी योग्य व्यवस्थापन करण्याचे धडे देण्याची गरज नव्याने अधोरेखित होत आहे. भारतात मोठ्या प्रमाणात दुर्लक्ष होत असलेल्या नागरिकशास्त्र या विषयाच्या अभ्यासक्रमात जर प्राधान्याने हा विषय समाविष्ट केला आणि तितक्याच गंभीरपणे तो शिकवला तरच गर्दीमुळे होणाऱ्या अपघाताचे प्रमाण कमी होण्याची शक्यता आहे. अन्यथा ठरावीक काळाने अशा दुर्घटना घडत राहतील आणि सरकारला भरपाई देत जावी लागेल.

पान १ वरून

## शाहरुखचा एन्काऊंटर...

त्या चकमकीत पोलिसांकडून शाहरुखवर गोळीबार करण्यात आला. स्वसंरक्षणार्थ पोलिसांनी शाहरुखच्या दिशेने गोळ्या झाडल्या, या एन्काऊंटर मध्ये शाहरुखला 4 गोळ्या लागल्या आणि यात त्याचा मृत्यू झाला होता.

दरम्यान, आता थेट पोलीस आयुक्तांकडूनच एन्काऊंटर करणाऱ्या पोलिसांना शाबासकी देण्यात आली असून 1 लाख रुपयांचं बक्षीसही जाहीर करण्यात आलं आहे.

**पोलिसांमुळेच तो आरोपी बनला - शाहरुखचे वडिल**

दरम्यान, माझा मुलगा किरकोळ गुन्हेगार होता, एन्काउंटर करण्याइतका कुख्यात गुंड तो नव्हता. त्याच्यावर काही गुन्हे दाखल होते. पण, बांबूने मारहाण झालेल्या प्रकरणात त्याच्यावर खोटा मोक्का लावण्यात आला. तो व्यवस्थित कामाला लागला होता. पण, पोलिसांनीच त्याला आरोपी केले, असे शाहरुखच्या वडिलांनी एन्काऊंटरच्या घटनेवर प्रतिक्रिया देताना म्हटल होते. तसेच, पुण्याच्या काळेपडळ पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी देखील शाहरुख उर्फ अट्टी शेखच्या वडिलांनी केली होती.

प्रबोधन

# विचारी व्हा

वेडसर देती दोष नशिबाला ।
देवालाही दोष देतात ते ॥
वेडसर देती दोष पूर्वजन्मा ।
कमालाही दोष देतात ते ॥
वेडसर देती दोष नवग्रहा ।
करणीला दोष देतात ते ॥
वेडसर देती दोष भूतरवेता ।
पापी दृष्टीलाही दोष देती ॥
सारे सारे खोटे वेड मात्र खरे।
दोष देण्याचीच वृत्ती त्यांची ॥
घडते ते सारे कार्यकारणाने ।
काही न घडणे देव-दैवे ॥
घडल्यानंतर कळते मूर्खांना ।
आधी शहाण्यांना तेच कळे ॥
म्हणून तो दोष देत नाही कोणा ।
सत्यांना- तथ्यांना करी मान्य ॥

जगात शहाणे थोडे, तर मूर्ख खूप, अशी स्पष्ट विभागणी आहे. थोडीच माणसं हुषार, बुद्धिमान, विचारी असतात. बाकीची बरीच माणसं निर्बुद्ध, अविचारी आणि वेडसर असतात, यात शंका नाही. पण प्रस्तुत अभंगात जे लोक अंधश्रद्धाळू आहेत, ते वेडे आहेत, असं म्हटलं आहे.

जे लोक दैववादी, भाग्यवादी आहेत त्यांना वेडंच म्हटलं पाहिजे. जे देव मानतात आणि कोणत्याही बऱ्या-वाईट घटनेसाठी देवाला जबाबदार धरतात, ते शहाणे नसतात. त्या अनुषंगाने जे पूर्वजन्म, पुनर्जन्म, गेल्या जन्मातील कर्म, नवग्रह, करणी, लागीर, भूतखेत, दृष्ट लागणे या सर्व गोष्टींवर विश्वास ठेवतात, ते शहाणे नसतात. जे आपल्याबाबत आणि सभोताली घडतं तो तो कार्यकारणभाव असतो. कारण असतं म्हणून कार्य घडतं. आपणाला जर असं का घडलं; हा प्रश्न पडला, तर आपण त्या मागील कारणं शोधली पाहिजेत. ती तपासली पाहिजेत. एवढेच नव्हे, तर आपल्याला जे जाणवतं, दिसतं, त्याचा परिणाम काय होणार आहे, ते कळलं पाहिजे. तर्कशुद्ध विचार करणाऱ्या माणसाला हे सर्व आपोआप समजतं. त्यासाठी तो भविष्यवेत्ता, त्रिकालज्ञानी असण्याची गरज नाही. असा विचारी माणूस अंधविश्वासू नसतो. तो सत्यग्राही असतो. जे घडलं ते यदृच्छेने, असं तो म्हणत नाही. जे घडलं, ते कारणीभूत घटकांचा परिपाक आहे, सत्य आहे आणि ते स्वीकारणं भाग आहे, असा त्याचा ठाम विचार असतो. अशा विचाराचा व्यवहार झाला, की तर्कहीनता आणि तर्कशुद्धता यातील फरक उघडा पडतो.

धन्य जोतिराव । थोर विचारक ।
ज्ञानाचे महत्त्व । ओळखले ॥१॥
एका अविद्येने केला आहे नाश ।
मर्म ओळखले । महाज्ञानी ॥२॥
स्त्रियांना पशूंचा। दर्जा समाजाने ।
देऊनी छळिले । किती युगे ॥ ३॥
त्यांच्या हाती शस्त्र । शिक्षणाचे देती ।
सावित्री-जोतिबा । धन्य जोडी ॥४॥
वर्णश्रेष्ठतेचा। फुगलेला फुगा ।
फोडिती जोतिबा । एका क्षणी ॥५॥
तळागाळातील । जनतेची दुःखे ।
ओढूनी आसूड । सांगे जोति ॥६॥
'अखंड' लिहून । उपदेश केला ।
ज्ञान बहुजना । होण्यासाठी ॥७॥
विधवांचे पिता । होऊनिया त्यांनी ।
रक्षिले मातृत्व । दयासिंधू ॥ ८॥
ज्ञान प्रसाराची । प्रेरणा शाहूंना ।
देई तो महात्मा । ज्ञानसूर्य ॥९॥
वंदन तयास । अहोरात्र करू ।
जगास उद्धारू । शक्य तेव्हा ॥ १०॥



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# जल, स्थल, वायू यावर मानवी अतिरेक वाढल्याने अनेक धोके निर्माण होऊन दुर्घटना होत आहे

दिवसेंदिवस ज्याप्रमाणे अत्याधुनिक सुविधा निर्माण होत आहे त्याच्या दुप्पट विणाशाचे दरवाजे उघडल्याने दुर्घटनांचे प्रमाणात मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते.ही स्थिती फक्त भारतातच नसुन संपूर्ण जगभर दिसुन येते.महत्वाचे म्हणजे जगभरातील अनेक देशात २०२५ मध्ये भयावह युद्धजन्य परिस्थिती निर्माण झाल्याचे दिसून येते व अनेक भयावह दुर्घटना पहायला मिळत आहे आणि दुर्घटनांची साखळी सुरूच आहे.म्हणजे आजच्या परिस्थितीत पृथ्वीवरील मानव, पशुपक्षी व संपूर्ण जीवजंतू अत्यंत कठीण परिस्थितीत जगत असल्याचे दिसून येते. आपण म्हणतो की आकाशातील प्रवास (विमानप्रवास) सर्वात सुरक्षित असल्याचे जगजाहीर आहे.परंतु आज विमानतळ दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा मोठ्या प्रमाणात वाढल्याचे दिसून येते. दिनांक १२ जूनला गुजरात मधील अहमदाबाद विमान दुर्घटना अंत्यंत भयावह होती. विमानाने उडान घेताच ३० सेकंदात एका मेडिकल होस्टेलवर कोसळले यात विमानातील २४१ प्रवाशांचा मृत्यू झाला व होस्टेलमधील अनेक विद्यार्थींचा मृत्यू झाला व अनेक गंभीररीत्या जखमी झाले. त्यामुळे आता प्रश्न निर्माण होतो की विमानाने प्रवास चांगला की वाईट. आपण हेलिकॉप्टर सुरक्षित समजतो परंतु हेलिकॉप्टरच्या दुर्घटनांचे प्रमाणात सुध्दा वाढले आहे याचे जिवंत उदाहरण म्हणजे दिनांक १२ तारखेला केदारनाथ दर्शनासाठी गेले असता दर्शनानंतर ते आर्यन एव्हिएशनच्या हेलिकॉप्टरने गुप्तकाशीकडे निघाले असताना अचानक हवामान बदलले दाट धुके व अवकाळी पावसामुळे दृश्यमानता कमी झाल्याने हेलिकॉप्टर जंगलात कोसळले यात एकूण ७ प्रवास्यांचा मृत्यू झाला.म्हणजे सध्याच्या परिस्थितीत निसर्ग सुध्दा मानवाच्या अतीरेकाला त्रासल्याचे दिसून येते व त्यामुळे दुःखद घटना घडतांना दिसतात.अशा परिस्थितीत प्रश्न उपस्थित होतो की आपल्यासाठी काय सुरक्षित आणि काय सुरक्षित नाही?मावळ तालुक्यातील प्रसिद्ध कुंडमळा येथे १५ जून रोजी पर्यटकांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केली होती.येथील इंद्रायणी नदीवरील असलेल्या ३२ वर्षे जुन्या पुलावर क्षमतेपेक्षा जास्त नागरिकांच्या गर्दीमुळे पुलाचा मधला भाग अचानक कोसळला.सुमारे ३५-४० जण पुलावरून कोसळल्याने जखमी झाले असून चौघांचा मृत्यू झाला ६ जणांची प्रकृती अत्यंत गंभीर आहे आणि नदीचा प्रवाह जास्त असल्याने अनेक जण वाहून सुध्दा गेल्याचे सांगितले जाते.अशाप्रकारे निसर्ग सर्वांचीच गोच्ची करतांना दिसते. २२ एप्रिल २०२५ ला पहलगाम येथील शांतमय ठिकाणी पर्यटक आनंद लुटण्यासाठी गेले असता अचानक आतंकवाद्यांनी पर्यटकांवर हल्ला केला यात २८ जणांचा निर्घृणपणे हत्या करण्यात आली.म्हणजे आजच्या परिस्थितीत एकांतवास सुध्दा कठीण झाला आहे.याचप्रमाणे दिवसेंदिवस रेल्वेचे सुध्दा अपघात वाढल्याचे दिसून येते.नुकताच मुंबई येथे लोकल ट्रेनचा अपघात झाला यात अनेकांचा बळी गेला.त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत मानवजातीसाठी कोणतेही ठीकाण सुरक्षित नसल्याचे दिसून येते.आतातर नौकरीवर जातांना,बाहेर जातांना, पायदळ फिरतांना सुध्दा आपण सुरक्षित आहोत की नाही याचीही शंका निर्माण झाली असून चिंता वाटायला लागली आहे.याहीपलीकडे आपण विचार केला तर देवदर्शन किंवा फिरणेही महागात पडतांना दिसत आहे.त्यामुळे प्रश्न निर्माण होतो की "जाये तो जाये कहा!"आतातर इजरायल -इरान युद्ध आरपारचे समजल्या जात आहे यामुळे तिसऱ्या महायुद्धाचे सावट निर्माण झाले आहे.कारण युक्रेन-रशिया संघर्ष सुरूच आहे सोबतच अनेक देशात गृहयुद्ध भडकल्याचे दिसून येते. सध्याचे युध्द साधे रहाले नसुन बॉम्ब वर्षाव, ड्रोन हल्ला, मिसाईल अशाप्रकारे अत्याधुनिक शस्त्रास्त्रे वापरल्या जात आहे. सध्याच्या परिस्थिती युक्रेन, रशिया, ईरान,इजरायल यांच्या युध्दामुळे सर्वत्र आगीचे सावट दिसून येते.यामुळे लाखोंच्या संख्येने जिवित हाणी होत आहेच सोबतच वित्तीय हानी सुध्दा मोठ्या प्रमाणात होत आहे.म्हणजेच मानवजातीसाठी सध्याचा काळ अत्यंत बिकट,गंभीर व धोकादायक स्थितीत येवून ठेपला आहे. आज पृथ्वीवर होत असलेल्या मानवी अतिक्रमणामुळे हिमकडा कोसळने, ज्वालामुखीचा उद्रेक, सुनामी, भूकंप ढगफुटी,अती पाऊस,अती उष्णता,अती थंडी आणि आता युध्दजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेला आगडोंब यामुळे सर्वत्र विणाशलिला दिसून येत आहे.मानवाने स्वतःच्या स्वाथार्साठी जितक्या सुखसुविधा निर्माण केल्या आहेत त्याचे दुष्परिणाम हळूहळू वाढत असून विनाशाकडे वाटचाल करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे. या संपूर्ण घटनाक्रमावरून लक्षात येईल की स्थल, वायू,जल, आकाश-पाताळ हे संपूर्ण ठिकाण आज मानवामुळे विणाशाचे कारण बनत आहे व यांमुळेच भयावह दुर्घटना होतांना दिसतात.



**रमेश कृष्णराव लांजेवार**
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

प्रबोधन

# वाढता गरजा वाढे संशोधन!

गरज ही शोधांची जननी आहे, असं नेहमी म्हटलं जातं आणि ते बरोबरही आहे. ज्यांच्या गरजा अधिक ते संशोधक असतात. ज्यांनी आपल्या जीवनातून गरजांची हकालपट्टी केली आहे, ते संशोधनाचे शत्रूच असतात. महात्मा गांधीजी आपल्या अनुयायांना गरजा कमी करण्याबद्दल नेहमी उपदेश करत; तरीही ते नेहमी मूलभूत संशोधन, निसर्गोपचारातील प्रयोग यात मनापासून रस घेत. आपल्याला दीर्घायुष्य लाभावं आणि राष्ट्राची सेवा वयाच्या एकशे पंचविसाव्या वर्षांपर्यंत करण्याची शारीरिक, मानसिक शक्ती आपण मिळवावी, यासाठी ते आहार-विहारात संशोधक- बुद्धी वापरीत.

शोधा म्हणजे सापडेल, असं येशू म्हणाले. पाश्चिमात्यांनी शोध घेणं हा आपल्या जीवनाचा मूलमंत्र ठरवला आणि ज्ञान-विज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड भर घातली. सुखी जीवन हे पाश्चिमात्यांचं ध्येय होतं. सुखाची साधनं पाहिजेत तर संशोधन केलं पाहिजे. १४ व्या शतकातील संशोधक रॉजर बेकनपासून आजच्या संशोधकांपर्यंत अनेक शास्त्रज्ञांनी माणसापुढे भौतिक सुखसाधनांचा अक्षरशः डोंगर उभा केला आहे. पौर्वात्यांनी या सुखसाधनांचा स्वीकार केला आहे. पण तो आभार मानून नव्हे, तर नाक मुरडून! ताकाला तर जायचं, पण भांडं मात्र लपवायचं, ही आमची रीत!

आपल्या महान ऋषिमुनींनी आणि साधूंनी आपणाला काय शिकवलं ? भक्ती! भक्तीचं साध्य काय? तर ईश्वर! ईश्वरप्राप्ती कशासाठी? मुक्तीसाठी आणि स्वर्गप्राप्तीसाठी! स्वर्ग कोठे आहे, हे माहीत नसणाऱ्यांनी काल्पनिक स्वर्गाची वर्णनं करावीत आणि लक्ष चौऱ्याऐंशी जीवयोनीतून आत्मा फिरून मनुष्य होतो आणि तो मुक्त झाला, की त्याचे पशू, कीटक, जीवजंतू अशा सजीवात होणारे जन्म वाचतात, अशी थाप मारावी, हे सर्वच अजब तर्कट आहे. पण माहीत नसलेल्या विषयावर बोलण्यात थापेबाज कसे निर्ढावलेले होते, याचं हे एक उदाहरण- एकनाथ तसे थोर संत होते. पण पृथ्वी, सूर्य, चंद्र यांच्याबद्दलचं त्यांचं ज्ञान फारच त्रोटक, अपुरं व विपर्यस्त होतं. त्यांचा एक अभंग 'संत आणि सायन्स' या पुस्तकात प्रा.मा.का. देशपांडे यांनी दिला आहे. तो असा-

रवि लोकाहूनि वरी । चंद्रलोक लक्षांतरी ।
चंद्र लोकाहूनि दुरी । लक्षांतरी तारालोक।

एकनाथांची अशी भाबडी कल्पना होती की, चंद्र हा सूर्यापेक्षा जास्त शीतल आहे, तेव्हा तो पृथ्वीपासून जास्त दूर असणारच! वास्तव काय आहे? पृथ्वी स्वतःभोवती फिरता-फिरता सूर्याभोवती फिरते. तसाच चंद्र पृथ्वीभोवती फिरतो. तात्पर्य, आपल्या देशातील देव-धर्माच्या तत्त्वज्ञानाने देशवासियांचं निम्मं नुकसान केलं आणि उरलेलं बुवा-महाराजांनी आणि आजकालच्या संस्कार, आस्था अशा दूरचित्रवाणीच्या वाहिन्यांनी केलं आहे. हे सत्य सांगण्याऐवजी आपले विद्वान पाश्चिमात्यांच्या नावाने सतत ठणाणा करतात. या विद्वानांची मुलं अमेरिकेत, युरोपात नोकरीला आहेत आणि हे बहादूरही परदेशगमनाची संधी सोडत नाहीत! पण खरे विचारवंत स्वामी विवेकानंद पाश्चिमात्यांबद्दल काय म्हणतात व कोणता संदेश देतात ते पाहा- 'आज जीवनाच्या अंतःप्रेरणांमुळे युरोपच्या प्रचंड डायनॅमोतून सतत महापुरासारखा ज्याचा प्रवाह लोंढ्यासारखा वाहात आहे ती शक्ती, ते स्वातंत्र्यप्रेम, स्वावलंबनाची ती प्रेरणा, ते अढळ मनोधैर्य, कृती करण्यातलं कौशल्य, ते एकाच ध्येयाचं बंधन, सुधारणेची ती तहान आपल्याला हवी आहे... स्वातंत्र्य, समता, जिज्ञासा, उत्साह, उद्योग याबाबतीत पाश्चिमात्यांहूनही अधिक पाश्चिमात्य व्हा.'

'गरजवंताला अक्कल नसते' म्हणतात. पण आपल्या गरजा ओळखायला अक्कलच लागते. तुकारामाप्रमाणे सोनेनाणे आम्हा मृत्तिके समान म्हणणारे आणि ठेविले अनंते तैसेचि राहावे म्हणणारे आपल्या सुखाचा मार्ग आपल्याच हातांनी बंद करीत असतात. त्यांना आदर्श मानणारेही ते पडले त्याच खड्डयांत आत्मिक नावाच्या भुक्कड समाधानासह पडतात. जगाला शहाणपण शिकवणाऱ्या संतांना देव, देवळं ही भट- भिक्षुकांनी आपला चरितार्थ चालवण्याच्या गरजेतून केलेली निर्मिती आहे हे रहस्य कळू नये किंवा अध्यात्मजन्य कर्मकांडे, ज्योतिर्विज्ञान (की अज्ञान ?) ही फसवणूक आहे हे कळू नये, ह्याला काय म्हणावं?

जो आपल्या गरजा ओळखतो, वाढवतो तोच शहाणा! गरजा कमी व्हाव्यात म्हणतो तो मूर्ख ! वास्तविक माणूस आणि पशू यांच्यात गरजांच्या आधारेच फरक करावा. ज्याच्या गरजा अधिक तो माणूस. संशोधकांना तो सतत प्रेरणा देतो. संशोधक त्याच्या गरजा पूर्ण करण्यासाठी धडपडतात. त्यातून शोध लागतात. त्यामुळे भौतिक सुखसाधनं वाढतात. म्हणून गरज हीच शोधांची जननी असं म्हटलं जातं. यासाठी पुढल्या पिढीला आता आपण नवा आशीर्वाद देऊ, 'गरजवंत व्हा!' कारण-

वाढता गरजा। वाढे संशोधन
होता संशोधन । सौख्य वाढे ॥१
सुखवृद्धी हेच । ध्येय जीवनाचे
त्याहून मोलाचे । काही नाही ॥२
साध्या जीवनाचे। कशाला कौतुक
ढोंग्याचे नाटक । प्रसिद्ध ते ॥ ३
पुन्हा जन्म नाही। आयुष्य मोलाचे
नाही लाभायाचे । कधी पुन्हा ॥४
दुर्लभ हा देह। देहातील मन
त्यास समाधान। सदा द्यावे ॥ ५
नवीन आकांक्षा। नव्या जीवनाच्या
खऱ्या माणसाच्या खुणा त्याच ॥६
इच्छा नवनव्या । बाळगा लोक हो
वैराग्याचा टाहो। नका फोडू ॥७
सर्वपरित्यागी। प्राणी तो अभागी
सदा दुःख भोगी । दुर्दैवी तो ॥८
मरताना तृप्त । मनाने मरावे
किमान कळावे । हेच सर्वा ॥९



**प्रा. डॉ. जे. बी. शिंदे**
844/1, साळोखेनगर,
कळंबा रोड, कोल्हापूर-416012
92258 09071

# मोहोळ : अवकाळीमुळे शेतीचे बाधित शेतकरी व दोन कोटी रुपयांचे नुकसान

**बाधित शेतकरी व नुकसानीची रक्कम**

- जिराईत बाधित शेतकरी ९ क्षेत्र ५ हेक्टर, नुकसानीची रक्कम ४२ हजार ५००.
- बागायत बाधित शेतकरी ४५२ क्षेत्र ३३४ हेक्टर, नुकसानीची रक्कम ५५ लाख ८ हजार १७०.
- फळ पिके बाधित शेतकरी ९५८, क्षेत्र ५५४ हेक्टर, नुकसानीची रक्कम एक कोटी २४ लाख ८५ हजार.

**मोहोळ (कटूसत्य वृत्त):-** मे महिन्यात मान्सूनपूर्व पावसाने मोहोळ तालुक्याला झोडपून काढले होते. या पावसाबरोबरच आलेल्या वादळी वाऱ्यामुळे तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. नुकसानग्रस्त पिकांच्या पंचनाम्याचे काम आता पूर्ण झाले असून विविध फळे व पिकांचे जवळपास दोन कोटी रुपयांचे नुकसान झाले असल्याची माहिती तहसीलदार सचिन मुळीक यांनी दिली.

मागील महिन्याभरापासून तालुक्यातील पापरी, आष्टी, शेटफळ, तेलंगवाडी, सिद्धेवाडी, घोडश्वर (बेगमपूर), अरबळी, मिरी, येणकी, वाघोली, परमेश्वर पिंपरी, कामती, कुरुल, सय्यद वरवडे, अंकोली, टाकळी सिकंदर, पाटकूल, पेनूर तसेच तालुक्याच्या पूर्व भागातील सावळेश्वर, पोफळी, गोटवाडी,

रामहिंगणी, वडवळ, लांबोटी, शिरापूर, आष्टी, भांबेवाडी, हिंगणी (नि), नरखेड, देगाव, वाळूज, मनगोळी, भैरववाडी, एकूरके, यल्लमवाडी, मसले चौधरी, डिकसळ, भोयरे, घाटणे, मलिकपेठ परिसराला वादळी वाऱ्यासह आलेल्या जोरदार अवकाळी आणि मान्सूनपूर्व पावसाने अक्षरशः झोडपून काढले आहे. या पावसाबरोबरच आलेल्या वादळी वाऱ्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले होते. याची दखल घेऊन तहसीलदार सचिन मुळीक यांनी नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या पिकांच्या पंचनाम्याचे आदेश

दिले होते. महिन्याभरापासून सुरू असलेल्या पंचनाम्याचे काम नुकतेच संपले आहे. पंचनामे करणाऱ्या तलाठ्यांनी आपला अहवाल महसूल प्रशासनाकडे सादर केला आहे.

खासदार प्रणिती शिंदे आणि आमदार राजू खरे यांनी पंचनामे वेळेत पूर्ण करण्यासाठी प्रशासनाला सूचना दिल्या होत्या. त्याच बरोबर

खासदार शिंदे यांनी नुकसानग्रस्त भागाला भेट देऊन पीकविमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना विम्याच्या रकमा शेतकऱ्यांना तातडीने देण्याबाबत तंबी दिली होती. पीकविम्याची रक्कम शेतकऱ्यांना तातडीने मिळावी, यासाठी त्यांचा अजूनही पाठपुरावा सुरू आहे.

# गुणवत्तापूर्ण पिण्याचे पाणी...

केंद्र शासनाने सुचना दिल्या आहेत.या मोहिमेतंतर्गत गावात पाणी तपासणी करण्यासाठी निवड केलेल्या व संकेतस्थळावर नोंदविलेल्या पाच महिलांची पडताळणी करणे, महिलांच्या पाणी गुणवता विषयक एफ. टी.के.प्रशिक्षणाच्या नोंदी घेणे, गावात आठवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांना एफ.टी.के.किटव्दारे पाणी तपासणीचे प्रात्यक्षिक देणे, ८ ते १० मधील विद्यार्थ्यांमार्फत शाळा, अंगणवाड्या, घरगुती नळ जोडण्यामधील पाणी नमुने तपासणी करणे, डब्यूक्यूएमआयएस पोर्टलवर नोंदी घेणे, नळ पाणी पुरवठा योजना स्त्रोत, घरगुती नळ जोडण्या, शाळा, अंगणवाड्यांची पाणी गुणवता तपासणी करण्यासाठी रासायनिक व जैविक एफ.टी.के.संचाचे वाटप करणे, स्थानिकांना पाणी गुणवत्ता तपासणी व त्यापासून होणारे फायदे सांगितले जाणार आहे.

जिल्ह्यातील ११२५ गावामध्ये क्षेत्रीय तपासणी संच(एफ.टी.के.) द्वारे प्रत्येक महिन्याला जैविक व रासायनिक पाणी गुणवत्ता तपासणी करावयाची आहे.यामध्ये सर्व शासकिय यंत्रणांनी सहभाग घेऊन पाणी गुणवत्ता तपासणी आणि व्यापक जनजागृती करावी.

**- अमोल जाधव**
उपमुख्य कार्यकारी
अधिकारी (पाणी व स्वच्छता)

**काय आहे क्षेत्रीय तपासणी (FTK) संच ?**

एफ.टी.के.म्हणजे क्षेत्रीय तपासणी संच हे एक पोर्टेबल उपकरण आहे. जे प्राथमिक स्वरूपात पिण्याच्या पाण्यातील रासायनिक आणि जैविक घटकांची तपासणी करण्यासाठी वापरले जाते.यामुळे पाण्याची गुणवत्ता त्वरित ठरवणे, गावपातळीवर नागरिकांना पाण्यातील अशुद्धता ओळखण्यास मदत करणे हा या संचाचा उदेश्य आहे.यामध्ये पिएच स्तर, क्लोरिन, नायट्रेट्स, फ्लोराइड,क्लोराईड, लोह,अल्कॉलिनिटी,गढूळपणा, हार्डनेस,कॅल्शिअम, मॅग्नेशिअम तसेच जैविक प्रदूषणबाबत तपासणी केली जाते.याचा लगेच निकाल मिळतो (प्राथमिक स्तरावर) मिळतो.या संचाद्वारे पाणी पुरवठा स्त्रोत, शाळा, अंगणवाडी व घरगुती नळ जोडण्याची पाणी गुणवत्ता तपासली जाणार आहे.

**मोहिमेमध्ये या विभागांचा राहील सहभाग**

एफ.टी.के.संचाद्वारे पाणी गुणवत्ता तपासणी जनजागृती मोहीमेमध्ये विविध विभागांचा सहभाग राहील. त्यामध्ये ग्रामपंचायत विभाग, महिला व बालकल्याण विभाग, आरोग्य विभाग, शिक्षण विभाग, पाणी पुरवठा विभागाचा सहभाग राहिल.सर्वांच्या मदतीने व्यापक जनजागृती मोहीम यशस्वी केली जाणार आहे.

वात्रटिका

**बदली टाळण्यासाठी**

नोकरी म्हटलं की बदली,
पण ती जेव्हा अटळ असते...
तरीही ती टाळण्यासाठी
जबरदस्त अटकळ असते...
कोणी दिव्यांग होतो तर
कोणाला होतो गंभीर आजार...
प्रशासन होते हतबल आणि
सरकार होते बेजार...

**हणमंत पडवळ,**
धाराशिव,
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स (0217)2605091 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone-0217-2605091 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

# विशेष पोलीस महानिरीक्षक सुनिल फुलारी यांचा वार्षिक तपासणी कार्यक्रम



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परीक्षेत्र, कोल्हापूर हे सोलापूर ग्रामीण पोलीस घटकाचे वार्षीक तपासणीच्या दौऱ्यावर असून दिनांक १६.०६.२०२५ रोजी उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, सोलापूर ग्रामीण या कार्यालयाची वार्षीक तपासणी घेतली आहे. आज दिनांक १७.०६.२०२५ रोजी पोलीस मुख्यालयाच्या कवायत मैदानावर सिरोमनियल परेड करीता हजर राहून परेडचे निरीक्षक केले. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे अडचणींवर उपाय योजना करण्यासाठी सैनिक संम्मेलामध्ये हजर राहीले आहेत.

या वार्षीक तपासणी कार्यक्रमामध्ये आयोजीत गुन्हे सभेच्यावेळी सोलापूर ग्रामीण घटकामध्ये कार्यरत असलेले पोलीस अधिकारी व अंमलदार यांच्यापैकी उत्कृष्ठ कामगिरी करणारे पदक व पुरस्कार प्राप्त अधिकारी व अंमलदार यांचा सत्कार केला. सत्कार प्राप्त अधिकारी व अंमलदार यांची नावे व कामगिरी पुढीलप्रमाणे

१) अजित पाटील, उपविभागीय पोलीस अधिकारी, करमाळा उपविभाग, करमाळा हे अहिल्यानगर जिल्ह्यामध्ये नेमणूकीस असताना सुपा पोलीस ठाणे येथे दाखल गु.र.नं. ४७८/२०२० भा.द.वि.क.३०२ या खूनाच्या गुन्ह्याचा तपास त्यांनी केला होता. त्यामध्ये अज्ञात तरूणांनी गाडीला धक्का लागल्याच्या कारणावरून एका महिली निघृण हत्या केली होती. श्री पाटील यांनी सदर अज्ञात आरोपींचा शोध अतिशय तांत्रीक व कुशलतेने घेवून अवघ्या २ दिवसामध्ये ५ आरोपींना अटक केली होती. तसेच सदर गुन्ह्यातील मुख्य आरोपीस १०२ दिवसांनी हैद्राबाद येथून अटक केली होती. त्याच्या या कामगिरीबद्दल त्यांना "मा. केंद्रीय गृहमंत्री यांचे उत्कृष्ठ गुन्हे अन्वेषण पदक" प्राप्त झाले आहे.

२) मनोज पवार, सहायक पोलीस निरीक्षक, मंद्रुप पोलीस ठाणे हे पुणे ग्रामीण जिल्ह्यातील वेल्हे पोलीस ठाणे येथे नेमणूकीस असताना अज्ञात आरोपीने अडीच वर्षाच्या चिमुकलीचे अपहरण करून तिच्यावर बलात्कार करून तिचा खून करून मृतदेह रस्त्यावरील पुलाखाली पाईमध्ये टाकून दिला होता. तपासी अधिकारी सपोनि पवार यांनी फॉरेन्सीक टीम, श्वान पथक यांच्या मदतीने पुरवे प्राप्त करून आरोपीस अटक केली होती. सदर आरोपीविरूध्द दोषारोप पत्र दाखल केले होते. यामध्ये आरोपीस मा. न्यायालयाने मरेपर्यंत फाशीची शिक्षा सुनावली आहे. त्याच्या या कामगिरीबद्दल त्यांना "मा. केंद्रीय गृहमंत्री यांचे उत्कृष्ठ गुन्हे अन्वेषण पदक" प्राप्त झाले आहे.

३) श्रीमती सुरेखा शिंदे, मपोसई व मपोकों/१९१३ अथार्ना शिंदे, भरोसा सेल, सोलापूर ग्रामीण घटकामध्ये बालविवाह प्रतिबंधक योजना राबविण्यात आली असून त्यामध्ये जिल्ह्यातील ४७० गावामधील ग्रामपंचायतीच्या ग्रामसभेत बालविवाह विरूध्द ठराव पास केला आहे. या योजनेमध्ये एकूण १०९ बालविवाह

रोखण्यात आले आहेत, त्याच्या कार्याबध्दल महाराष्ट्र राज्य बाल हक्क संरक्षण आयोगाकडून त्यांना " बालस्नेही पुरस्कार - २०२४" देवून गौरविण्यात आले आहे.

४) श्वान पथकातील टेरी व जिमी श्वान सोलापूर ग्रामीण पोलीस दलातील स्निपर डॉग टेरी व जिमी यांनी मागील वर्षी" कोल्हापूर परिक्षेत्रीय व महाराष्ट्र राज्य पोलीस कर्तव्य मेळावा "मध्ये सुवर्ण पदक प्राप्त केले होते. तसेच या श्वानांनी आखिल भारतीय पोलीस कर्तव्य मेळामध्ये अनुक्रमे ५ वा व ७ वा. क्रमांक प्राप्त केला आहे. याबध्दल या श्वानांचा तसेच त्यांना प्रशिक्षण देवून हाताळणारे पोलीस अंमलदार पोह सिध्दलींग स्वामी, पोह चिदानंद रायकोटी, पोकों राजू इंगळे यांचा देखील सत्कार करण्यात आला आहे.

५) उत्कृष्ट गुन्हे तपास सोलापूर ग्रामीण घटकामध्ये मागील काही दिवसामध्ये गुन्ह्यांचा उत्कृष्ट व कुशलतेने तपास करणारे पोलीस अधिकारी व अंमलदार यांचा देखील सत्कार या गुन्हे सभेमध्ये करण्यात आला आहे. यामध्ये पोनि सुरेश निंबाळकर, स्था.गु.शा. पोनि नारायण पवार, टेंभूर्णी पोस्टे, पोनि बालाजी कुकडे, बाशी शहर सपोनि चौधरी, अकलूज पोस्टे यांचा व त्याच्या पथकातील ३२ अंमलदार यांचा देखील प्रशांसापत्र देवून सत्कार करण्यात आला आहे.

यावेळी बोलताना सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परीक्षेत्र, कोल्हापूर यांनी पदक, पुरस्कार व प्रशंसापत्र प्राप्त पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे कौतूक केले. तसेच यापुढे "प्रत्येक पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी आपले कर्तव्य हे प्राणणिक व चोखपणे बजावून पोलीस खात्यास शोभणीय काम करावे. करण्यात आलेल्या कामाचे बक्षीस, पदक चे प्रस्ताव सादर करावेत व अधिक अधिक बक्षीस व पदके प्राप्त करावीत. जेणेकरून त्यांचे हे काम इतर पोलीस अधिकारी व अंमलदार यांना स्फूतीर्दायक होईल" असे मनोगत व्यक्त केले आहे.

यावेळी सुनिल फुलारी, विशेष पोलीस महानिरीक्षक, कोल्हापूर परीक्षेत्र, कोल्हापूर यांचसह अतुल कुलकर्णी, पोलीस अधीक्षक, प्रितम यावलकर, अपर पोलीस अधीक्षक, सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सर्व पोलीस ठाणेप्रभारी अधिकारी व अंमलदार हे उपस्थित होते.

# उमेश पाटलांवर सोलापूर राष्ट्रवादीच्या जिल्हाध्यपदाची धुरा



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे अत्यंत निकटवर्तीय उमेश पाटील यांची राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. उमेश पाटील यांच्या नियुक्तीने राष्ट्रवादी काँग्रेसला तब्बल सात महिन्यांनंतर नवा कॅप्टन मिळाला आहे.

विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर दीपक साळुंखे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाचा, तसे पक्षाचा राजीनामा देऊन शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात प्रवेश केला होता. तेव्हापासून राष्ट्रवादी काँग्रेसचे जिल्हाध्यक्षपद रिक्त होते. जिल्हाध्यक्षपदासाठी उमेश पाटील यांच्यासोबतच अनेक नावे चर्चेत होती. अनेकांनी जिल्हाध्यक्षपदासाठी पक्षश्रेष्ठींकडे इच्छा बोलून दाखवली होती. अनेकांची इच्छा असूनही अजितदादांनी थेट नकार दिल्याने त्यांना आपल्या इच्छेला मुरड घालावी लागली होती.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पक्षाचे अध्यक्ष तथा उपमुख्यमंत्री अजित पवार आणि प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी उमेश पाटील यांच्या खांद्यावर सोलापूर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या जिल्हाध्यक्षपदाची धुरा सोपवली आहे. सोलापूर जिल्ह्यात सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचा एकही आमदार नाही. पक्षाचा आमदार नसला तरी सोलापूरमध्ये राष्ट्रवादीची ताकद आहे.

सोलापूर जिल्ह्यातील सर्व सत्तास्थाने एकेकाळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ताब्यात होती. त्यात जिल्हा परिषदेपासून बहुतांश पंचायत समित्यांवरही पक्षाचा झेंडा होता. मात्र, मागील निवडणुकीत अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या ऐवजी जनतेने ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला निवडून देणे पसंत केले होते, त्यामुळे अजितदादांच्या राष्ट्रवादीला विधानसभा निवडणुकीत सोलापुरात एकही जागा मिळू शकलेली नाही. त्यामुळे राष्ट्रवादी काँग्रेसला गतवैभव मिळवून देण्याचे मोठे आव्हान उमेश पाटील यांच्यापुढे असणार आहे.

# सोलापूर येथील सैनिकी मुलां, मुलींचे वसतिगृहात प्रवेशबाबत आवाहन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)**:- जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, सोलापूर यांचे अधिपत्याखाली सुंदरमनगर, विजापूर रोड, सोलापूर येथे सैनिक मुला, मुलींचे वसतिगृह असून, आजी, माजी सैनिकांच्या पाल्यांना येथे सवलतीच्या दरात निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध आहे. तसेच माजी सैनिक विधवा पत्नीचे पाल्य, शहीद सैनिकांच्या पाल्यांना व सैनिकांच्या अनाथ पाल्यांना वसतिगृहामध्ये निःशुल्क भोजनाची व निवासाची सोय उपलब्ध आहे. इच्छुकांनी वसतिगृह अधिक्षक, अधिक्षीका यांचेकडून प्रवेश पुस्तिका, अर्ज घेऊन त्यांनी दिनांक 30 जून 2025 पर्यंत सैनिकी मुलां, मुलींचे वसतिगृह अधिक्षक, अधिक्षीका यांचेकडे अर्ज सादर करावेत असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे आजी, माजी सैनिकांचे तसेच सैनिक विधवांचे व शहीद सैनिकांचे पाल्य सोलापूर येथील शैक्षणिक संस्थेत इयत्ता 8 वी ते पुढील पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे शिक्षण घेत आहेत आणि जे वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छितात त्यांनी अर्ज सादर करावेत तसेच वसतिगृह माहे जुलै 2025 पासून सुरू करण्याचे प्रस्तावित आहे. तसेच खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेतलेल्या माजी सैनिकांच्या पाल्यांचे सैनिकी मुलां, मुलींच्या वसतिगृहामध्ये प्रवेश हा प्रथम प्राधान्य म्हणून पाल्याला प्रवेश त्याच जिल्ह्यात, शहरात शाळा किंवा महाविद्यालयामध्ये घेतलेला असावा व तदनंतर द्वितीय म्हणून खाजगी शिकवणीमध्ये प्रवेश घेतलेल्या पाल्यांनाही देण्यात येईल.

वरील प्रवेश प्रक्रियेमध्ये सैनिकांच्या पाल्यांना प्राधान्य देण्यात येईल. वसतिगृहात जागा उपलब्ध असल्यास इतर नागरी पाल्यांचा प्रवेशासाठी विचार करण्यात येईल. तसेच दिनांक 8 जूलै 2025 रोजी सकाळी 10.00 वाजता प्रवेश बैठक आयोजित केली असून प्रवेश अर्ज सादर केलेल्या पाल्यांनी त्यांचे पालकासह प्रवेश प्रक्रियेसाठी संबंधित सर्व कागदपत्रासह उपस्थित रहावे. अधिक माहितीसाठी मुलींचे वसतिगृह 0217- 72301778, 9527584034 व मुलांचे वसतिगृह 0217- 72302228, 9890768965 या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मिलिंद तुंगार यांनी केले आहे.

# चेंगराचेंगरीच्या बारा ठिकाणी २५० पोलीस राहणार तैनात

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- आषाढी वारीच्या काळात चेंगराचेंगरी होणारी १२ ठिकाणे शासनाकडून निश्चित करण्यात आली आहेत. या ठिकाणी २५० पोलीस तैनात करण्यात येतील. याशिवाय सध्या सुरू असलेल्या पावसाचे प्रमाण पाहता पालखी विसाव्याच्या ठिकाणी सात लाख चौरस फूट वॉटरप्रूफ मंडप टाकण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी दिली.

आषाढी यात्रा तयारीच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी पत्रकारांशी संवाद साधला. ते म्हणाले, मागील वर्षी आषाढी एकादशीच्या निमित्ताने पंढरपुरात येणाऱ्या वारकऱ्यांचे पावसापासून संरक्षण होण्यासाठी ३ लाख १५ हजार चौरस फूट वॉटरप्रूफ मंडप उभारण्यात आला होता. यंदा पाऊस जास्त असल्याने पंढरपुरातील पालखी विसाव्याच्या ठिकाणी ७ लाख चौरस फूट मंडप टाकण्यात येणार असल्याचे आशीर्वाद यांनी सांगितले.

आषाढी 'सोहळ्यासाठी जिल्ह्यात येणाऱ्या वारकऱ्यांना मूलभूत सुविधा निर्माण करुन देण्यात येत आहेत. सध्या सुरू असलेला पाऊस पाहता वारकऱ्यांना आरोग्यासह अन्य सुविधा पुरविण्यासाठ प्रशासनाकडून प्रयत्न करण्यात येत आहेत. पिण्याचे पाणी, शौचालयांची सुविधाही प्राधान्याने पुरविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले.

आषाढी वारीनिमित्त बार्शी, माढा व करमाळा या तालुक्यांतून पंढरपूरकडे येणाऱ्या वारकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा देण्यात येत आहेत. पालखी मागार्ची पाहणीही पूर्ण करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत यंदा अडीच पट अधिक मुरुमीकरण करण्यात येत आहे.

पालखी मार्गावरील वारकऱ्यांना आरोग्याची सुविधा देण्यासाठी २१ ठिकाणी प्रत्येकी पाच बेडची आसीयू सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. यासाठी इंडियन मेडिकल असोसिएशचे सहकार्य घेण्यात येत आहे. वारकऱ्यांची आरोग्य सेवा करणाऱ्या डॉक्टरांची राहण्याची व भोजनाची सोय प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

वारीत असलेल्या गर्दीवर नियंत्रण ठेवण्यासाठी यंदा पहिल्यांदाच सर्व प्रशासकीय यंत्रणेचे समन्वय असलेला नियंत्रण कक्ष स्थापन करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक आदींचे या नियंत्रण कक्षावर नियंत्रण असणार आहे.

वारीच्या काळात दुरध्वनी संपकार्साठी कर्मचाऱ्यांना १०० वायरलेस फोन देण्यात आले आहेत. याशिवाय ७० ठिकाणी वायफायची सुविधा देण्यात आली असून प्रत्येक ठिकाणी निःशुल्क दुरध्वनी सुविधा वारकऱ्यांसाठी देण्यात येत असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

**चंद्रभागेतील होडीत फक्त वीस व्यक्तींना परवानगी**

आषाढी वारी काळात कोणतीही दुर्घटना घडू नये यासाठी आवश्यक उपाययोजना करण्यात येत आहेत. वारी काळात चंद्रभागा नदीत होडीतून प्रवास करताना फक्त २० व्यक्तींनाच परवानगी देण्यात आली आहे. याशिवाय होडीचे फिटींग प्रमाणपत्र तपासूनच त्यांना परवानगी देण्यात येणार आहे. नियम मोडणाऱ्या होडीचालककांवर कारवाई करण्यात येणार असल्याचे जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी सांगितले.

# रोहिणी गाजूल विद्यार्थिनीला 'नीट'च्या कोचिंग फीसाठी मनूच्या HHOC ची मदत



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- सोलापूर येथील वालचंद कला आणि विज्ञान महाविद्यालयात इंटरमिजिएट दुसऱ्या वर्षाची विद्यार्थिनी रोहिणी गाजूल डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहते. हे ध्येय साध्य करण्यासाठी तिच्या कुटुंबाने तिला मदत करण्याचा दृढनिश्चय केला आणि तिच्या वडिलांच्या भविष्य निर्वाह निधीतून पैसे काढून तिच्या पहिल्या वर्षाच्या NEET कोचिंग फी भरण्यास यशस्वी झाले. रोहिणी आर्थिकदृष्ट्या अडचणीत असलेल्या कुटुंबातून येते. तिचे वडील रुग्णालयात वॉर्ड बॉय म्हणून काम करतात आणि तिची आई बिडी कामगार आहे. त्यांचे माफक उत्पन्न त्यांच्या सहा सदस्यांच्या कुटुंबाच्या दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी पुरेसे आहे, ज्यामध्ये चार मुली आहेत. या आर्थिक अडचणींमुळे, ते दुसऱ्या वर्षाच्या ठएएळ कोचिंग फी भरू शकत नव्हते. या आव्हानात्मक काळात, रोहिणीच्या कुटुंबाने मदतीसाठी मनूच्या HHOC संस्थेशी संपर्क साधला. कुटुंबाची आर्थिक पार्श्वभूमी पूर्णपणे पडताळून पाहिल्यानंतर, मनूच्या एचएचओसीने २२ मे २०२५ रोजी तिच्या दुसऱ्या वर्षाच्या एनईईटी कोचिंग फीमध्ये ६५,००० योगदान देऊन मदतीचा हात पुढे केला.

मनूच्या एचएचओसीच्या प्रतिनिधीने सांगितले की, 'आम्ही चांगले भविष्य घडवण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या वंचित पार्श्वभूमीतील व्यक्तींना मदत करण्यास वचनबद्ध आहोत. आर्थिक अडचणींना तोंड देणाऱ्या विद्यार्थ्यांना आमच्याशी संपर्क साधण्यास आम्ही प्रोत्साहित करतो. मनूची एचएचओसी नेहमीच गरजूंना मदत करण्यास तयार असते, विशेषतः शिक्षण आणि इतर आवश्यक मदतीसाठी.' संपर्क क्रमांक ८७९०० ०५१४०

# विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार देऊन सुसंस्कृत आणि सुशिक्षित करा- सचिन कल्याणशेट्टी



**अक्कलकोट (कटूसत्य वृत्त)**:- आपल्या अक्कलकोट तालुक्यातील मैंदर्गी येथील जिल्हा परिषद प्राथमिक कन्नड मुलांची व मुलींची शाळा येथे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील इयत्ता १ लीमध्ये प्रवेश घेतलेल्या नवागत विद्यार्थ्यांच्या स्वागत समारंभ सोहळ्यानिमित्त आयोजित कार्यक्रमात सहभागी झालो. तसेच नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत करून मार्गदर्शन केले.

याप्रसंगी नवीन विद्यार्थ्यांची बैलगाडीतून भव्य मिरवणूक काढत उत्साहात स्वागत करण्यात आले. या उपक्रमाच्या माध्यमातून शालेय विद्यार्थ्यांना शिक्षणाची आवड निर्माण होण्यास मोठी मदत होते. अभ्यासाची गोडी त्यांच्यामध्ये वाढीस लागते.

यासोबतच, ज्ञानार्जनाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना सकारात्मक विचार देऊन सुसंस्कृत आणि सुशिक्षित करण्याचे आवाहन शिक्षकवगार्ला केले.या वेळी गटशिक्षणाधिकारी प्रशांत आरबाळे, मुख्याध्यापक शिवचलप्पा हडलगी, विलास गव्हाणे, तुकप्पा नागुर, सुरेश नागूर, अनिल पाटील,

दयानंद बमनळी, संजय मोरे, सिद्धाराम जकापुरे, लक्ष्मीपुत्र निंबाळ, अयुब लुकडे, बसवराज बणेसुर, रुडप्पा येळसंगी, सिद्धाराम जंगी, तिप्पण्णा नागणसुर, चांद लुकडे यांच्यासह शिक्षक, पालक, विद्यार्थी आणि स्थानिक ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# संभाजी ब्रिगेडच्या वतीने राष्ट्रमाता जिजाऊ यांना अभिवादन



**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- राष्ट्रमाता माँ जिजाऊ साहेब यांच्या 351 व्या स्मृतिदिनानिमित्त पुणे येथील लाल महल मधील राष्ट्रमाता जिजाऊ यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे पश्चिम महाराष्ट्र अध्यक्ष श्याम कदम जिल्हाध्यक्ष संभाजी राजे भोसले महिला जिल्हाध्यक्ष मीनलदास शहर अध्यक्ष शिरीष जगदाळे जिल्हा सचिव सिद्धाराम सवय शहर उपाध्यक्ष मनीषा कोळी शहर संघटक जयश्री जाधव आदी उपस्थित होते.

# १८ जूनला शहरात योग दिंडीचे आयोजन

**सोलापूर, (कटूसत्य वृत्त)**:- निरोगी आरोग्यासाठी नियमित योग करणे आवश्यक आहे. योगासने, प्राणायाम, ध्यान केल्याने शरीराला शांती व सुख मिळते.

अश्या प्राचीन व शात्रोक्त असेलेल्या भारतीय योगाची माहिती व जाणीव जागृती व्हावे या उद्देशाने केंद्र शासनाचे माहिती व प्रसारण मंत्रालय, केंद्रीय संचार ब्यूरो, सोलापूर आणि योग दिवस समन्वय समिती, सोलापूर यांच्या सयुंक्त विद्यमाने दिनांक १८ जून रोजी सकाळी ०७.०० वाजता ह.भ.प. आप्पाराव बचुटे उद्यान, दमाणी नगर, सोलापूर येथे योग दिंडीचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय संचार ब्यूरोचे सहायक प्रसिद्धी अधिकारी अंबादास यादव यांनी दिली आहे.

सदर दिंडीच्या उद्घाटनासाठी सोलापूर महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त रवी पवार आणि पोलीस उपायुक्त अजित बोऱ्हाडे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. सदर दिंडीमध्ये शहरातील पतंजली योग पीठ, योग सेवा मंडळ, विवेकानंद केंद्र, योग साधना मंडळ, भारतीय योग संस्था, योग प्रभा मंडळ, योग असोसिएशन, गीतापरिवार सर्व कल्याण योग, रामचंद्र मिशन आणि सर्वोदय योग मंडळाचे पदाधिकारी, युवक आणि नागरिक सहभागी असणार आहेत.

सदर योग दिंडी सकाळी ०७.०० वाजता आप्पाराव बचुटे उद्यान येथून पावन गणपती- लक्ष्मी नगर- गंगा नगर-जगताप हॉस्पिटल- मरीआई चौक-सन सिटी रोड आणि आप्पाराव बचुटे उद्यान येथे समारोप होईल. सदर योग दिंडीमध्ये नागरीकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन आयोजाकाकडून करण्यात आले आहे.

# मंत्री भरत गोगावले यांच्या प्रतिमेस मारले जोडे

**सोलापूर (कटूसत्य वृत्त)**:- माजी मुख्यमंत्री उध्दव ठाकरे आणि त्यांच्या पत्नी रश्मी ठाकरे न यांच्या विरोधात एकनाथ शिंदे गटाचे मंत्री भरत गोगावले यांनी त वादग्रस्त विधान करून शिवसेना फुटीला रश्मी ठाकरेच कारणीभूत असल्याचा आरोप केला आहे. या वक्तव्याच्या निषेधार्थ सोलापूर शहर जिल्हा शिवसेना आणि महिला आघाडीच्यावतीने सोमवारी, सात रस्ता येथे तीव्र धरणे आंदोलन केले. यावेळी गोगावले यांच्या प्रतिमेस जोडोमार आंदोलन करून महिला आघाडीच्यावतीने गोगावले यांना बांगड्यांचा अहेर भेट देण्यात आला.

यावेळी शिवसेना ठाकरे पक्षाच्या उपनेत्या अस्मिता गायकवाड यांनी रश्मी वहिनींबद्दल बोलाल तर याद राखा जीभ हासडून हातात देऊ असा इशारा दिला. तर जिल्हाप्रमुख संतोष नपाटील म्हणाले, भरत गोगावले इन यांनी पुन्हा एकदा असे विधान केले तर त्याला चोख प्रत्युत्तर देण्यात येईल. पदाच्या लालसेपोटी त्यांनी हे बेताल वक्तव्य केले आहे. सत्तेसाठी शिवसेना पक्षाशी गद्दारी करणाऱ्यांनी गोगावले यांनी जनाची नाही तर मनाची तरी लाज बाळगली पाहिजे.

पदाच्या लालसेपोटी बेताल वक्तव्य करणाऱ्या गोगावले यांचा धिक्कार असो आदी आशयाच्या घोषणा यावेळी देण्यात आल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख रविकांत कांबळे, खंडू सलगरकर, शिवा माळी, इलियास शेख, सत्तार शेख, कबीर शेख, संतोष घोडके, लोकसभा क्षेत्र संघटिका शशिकला चिवडशेट्टी, शहर संघटिका प्रीती नायर, जोहरा रंगरेज, मीनल दास, उपशहर संघटक मीनाक्षी गवळी, रमा सरवदे, मीना सुरवसे, अनिता राठोड आदी उपस्थित होते.

## जाहीर प्रसिध्दीकरण

क्रं.जन्म मृत्यू नोंदणी /एस.आर/५६/२०२५ नि.

**सांगोला येथील मे. तहसिलदार सो, यांचे न्यायालयात**

श्री. पिंकू कबीर चंदनशिवे
रा.गौडवाडी ता. सांगोला जि.सोलापूर } अर्जदार

**विरुध्द**

ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत, गौडवाडी ता. सांगोला जि. सोलापूर } सामनेवाला

ज्याअर्थी अर्जदार यांची आई पद्मिनी कबीर चंदनशिवे हे दि. ११.१०.२००८ रोजी मौजे गौडवाडी ता. सांगोला जि. सोलापूर येथे राहत्या घरी मयत झालेले आहेतपरंतु सदर मृत्यूची नोंद ग्रामपंचायत दप्तरी करण्याचे अनावधानाने राहून गेलेले आहे. तरी अर्जदार यांनी त्यांच्या मृत्यूची दाखल्याची गरज भासल्याने अर्जदार यांनी मे.कोर्टात मृत्यूची नोंद ग्रामपंचायत, गौडवाडी दप्तरी धरणेकामी या मे कोर्टात अर्ज दाखलकेला आहे.

त्याअर्थी ज्या कोणाची, त्याबाबत हरकत असेल त्यांनी सदरची नोटीस प्रसिध्द झालेपासून तीस दिवसाच्या आत अथवा नेमलेली ता. १७/०७/२०२५ रोजी स्वत: अगरवकीला मार्फत लेखी हरकत द्यावी. अन्यथा मो. कोर्ट योग्य ते हुकूम करतील मगकोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली. तारीख १७/०६/२०२५

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र:३५६/२०२५ नि.०६

**सोलापूर येथील मे.सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन श्रीमती व्ही. ए. कुलकर्णी सो, याचे कोर्टात**

१) ताजोद्दीन नबीलाल शेख, वय ३६ वर्षे, धंदा व्यापार, रा. ३९२, न्यु पाच्छा पेठ, लालबहादूर शास्त्री हायस्कुल जवळ, सोलापूर.
२) परवीन पती अशपाक पिरजादे, वय ४२ वर्षे, धंदा घरकाम, रा.डॉ. सी.जी. रोड, चेंबूर, जीवन संग्राम नगर, एफ.सी.आय.,मुबंई
३) महेजबीन पती अकबर पठाण, वय ४० वर्षे, धंदा घरकाम, रा. ३८८६, राजन मिल, बार्शी.
४) निलोफर पती अस्लम पठाण, वय ३७ वर्षे, धंदा घरकाम, रा. ३९२, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर. } अर्जदार

।। **विरूध्द** ।।

कोणी नाही } सामनेवाला

ज्याअर्थी सदरहु अर्जदार नं. १ ते ४ यांचे पिता मयत नवीलाल अकबरसाब शेख यांचेदि.१४/१२/२०२१ रोजी सोलापूर येथे निधन झालेले आहे. सदरहू मयत नबीलाल अकबरसाव शेखत्यांच्या हयातीत त्यांची पत्नी नामे सायराबानू नबीलाल शेख ही दि.२२/०८/२००५ रोजी मयतझालेली आहे. मयत नबीलाल अकबरसाव शेख त्यांच्या वृध्दपकाळात व त्यांचे मृत्युपावेतो यातीलअर्जदारसोबत राहण्यास होते. सदरह मयत नबीलाल अकबरसाव शेख यांचे देखभाल पालनपोषणत्याचे हयाती पर्यंत यातील अर्जदार नं. १ यांनीच केलेली आहे. तसेच त्यांचे मृत्युपश्चातअत्यंसंस्काराचे वेळी व तद्नंतरचे सर्व धार्मिक विधी वगैरे अर्जदार नं. १ यांनीच केलेले आहेत. मयतनबीलाल अकबरसाब शेख यांचे मृत्युपश्चात अर्जदार हेच मयताचे जवळचे नातेवाईक व कायदेशीरवारस आहेत.

**मिळकतीचे वर्णन :** डि व सब डि सोलापूर पैकी तालुका उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूरमहानगरपालिका हद्दवाढ भागामधील मजरेवाडी येथील जुना सव्हे नं. २४१/२/४ व २४१/२/६यांसी नवीन सव्हे नं. ३६/२/४ व ३६/२ / ६ या दोन्ही जमिनीतील व्यंकटेश्वर नगर भाग-३ यानावाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील प्लॉट नं. १३२ याचे एकूण क्षेत्र ६८० चौ. फुट अथवा ६३.१९चौ.मी. यांसी म.न.पा मालमत्ता क्र. ६६६१७३ ही खुली जागा.

त्याअर्थी यातील अर्जदार नं. १ ते ४ हे वर नमुद मयत नबीलाल अकबरसाब शेख यांचे वारसअसल्याबाबतचा हेअरशिप सर्टीफिकेट अर्जदार नं. १ ते ४ यांचे नांवे मिळणेकामी या मे. कोर्टात अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी यातील अर्जदार नं. १ ते ४ हे मयताचे जवळचे वारस नाहीत अथवा अन्य कोणी आहेत असे जर कोणाचे म्हणणे असेल तर अशा हरकतदारांनी सदरचे जाहीर प्रसिध्दीकरण प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत किंवा नेमलेली तारीख दि. ०१/०७/२०२५ रोजी मे. कोर्टात हजर राहून आपल्या हरकती नोंदऊन वर नमुद वेळेत कोणाची हरकत आली नाही तर सदरचे मे. कोर्ट अर्जदारांचे नावे हेअरशिप सर्टीफीकेट देण्याचा हुकूम करेल, त्यानंतर कोणाची हरकत चालणार नाही, याची नोंद घ्यावी..

हे जाहीर प्रसिध्दीकरण दिले ता.१८/०६/२०२५

(लिपिक) (शिक्का) **सहा.अधिक्षक, सिव्हील जज्ञ सिनिअर डिव्हीजन, सोलापूर**

## जाहीर प्रसिध्दीकरण

दि.कि.अर्ज क्र:३२४/२०२५ नि.०५

**सोलापूर येथील मे. सिव्हील जज्ञ सिनीयर डिव्हीजन श्री रेडकर साहेब यांचे कोर्टात**

१)अम्बुवाई रामलू नामन
वय ७८ वर्षे, धंदा घरकाम
२)गोपी रामलू नामन
वय ५८ वर्षे, चंदा: कामगार
३)कृष्णा रामलू नामन
वय ५० वर्षे, चंदा: कामगार
४) हरी रामलू नामन
वय: ४७ वर्षे, धंदा कामगार
अर्जदार क्र. १ ते ४ स. ५२९/३, गंगा चौक, धर्मण्णा सादुल शाळेजवळ, निलम नगर, मजरेवाडी, सोलापूर
५) भारती समलू नामन (लग्नापूर्वीचे नाव)
भारती कृष्णमुर्ती गुंटुकू (लग्नानंतरचे नाव)
वय: ४७ वर्षे, धंदा गृहिणी
रा. ९-५-३३२/२ (छ), मार्कडेय नगर, करीम नगर, जि. करीम नगर राज्य तेलंगणा } अर्जदार

**विरुध्द**

कोणीही नाही. } सामनेवाला

ज्या अर्थी यातील कै. रामलू लछमय्या नामन यांचे दि. २५/११/१९८५ रोजी सोलापूर येथे निधन झालेले आहेत. अर्जदार क्र.१ ही कै. रामलू लछमय्या नामन यांची पत्नी आहे. तर अर्जदार नं. २,३ व ४ हे कै. रामलू लछमय्या नामन यांची मुले आहेत. तर अर्जदार क्र. ५ ही के. रामलू लछमय्या नामन यांची मुलगी आहे. कै. रामलू लछमय्या नामन यांचे नावे खालील नमुद मिळकत आहे. मिळकतीचे वर्णन:- डि व सब डि. सोलापूर पैकी ता उत्तर सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका हद्दवाढीतील मजरेवाडी येथील जुना सर्व्हे नं. २३१ यासी नवीन सर्व्हे नं. २७ पैकी थोबडे नगर या नावाने ओळखल्या जाणाऱ्या भागामधील प्लॉट नं.५२९ याचे हद्द पूर्वेपश्चिम ४० फुट व दक्षिणोत्तर २५ फुट असे एकूण क्षेत्र १००० चौ.फुट इतके असून त्यातील पत्राशेड असलेली घरजागा, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत. त्यातील तदंगभूत वस्तुसह व वहिवाटचे हक्कासह सदर मिळकतीत चालू विज कनेक्शन असून यासी सोलापूर महानगरपालिका मिळकत क्र.६८०४३० असा आहे.

त्याअर्थी अर्जदार हे कै. रामलू लछमय्या नामन यांचे कायदेशीर वारसदार आहेत.अर्जदार यांनी वारस दाखला मिळणेकामी वरिष्ठ दिवाणी न्यायालय, सोलापूर येथे सदरचाअर्ज दाखल केलेला आहे. तरी कोणाचीही, कोणतीही कसलीही हरकत असल्यास हेजाहीर पब्लीकेशन दिलेपासून ३० दिवसांच्या आत किंवा नेमलेली तारीख २२/०७/२०२५रोजी हरकत घेण्याबाबत यावे. अन्यथा कोणाचीही हरकत नाही असे समजण्यात येईल व मे.कोर्ट योग्यते आदेश करतील.

हे जाहीर पब्लीकेशन दिले ता. १८/६/२०२५

कनिष्ठ लिपीक (शिक्का) **हुकूमावरुन सहा.अधिक्षक मे. वरीष्ठ दिवाणी न्यायालय, सोलापूर**